पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,पिंपरी पुणे – १८

माध्यमिक शिक्षण विभाग

एकत्रित मानधनावर करार पध्दतीने सहाय्यक शिक्षक नेमणुका करणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष – २०२४-२०२५ साठी एकत्रित मानधनावर करार पध्दतीने मराठी व ऊर्दु माध्यमाच्या शाळांसाठी सहाय्यक शिक्षकांची आवश्यकता आहे.त्याकरीता खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हताधारकांकडून समक्ष अर्ज मागविणेत येत आहेत.

१) मराठी माध्यम-

आवश्यक पदे – ७१

| अ.क्र. | विषय | आवश्यक पदसंख्या |
|---|---|---|
| १. | मराठी | ३२ |
| २. | हिंदी | २० |
| ३. | गणित | ३ |
| ४. | विज्ञान | ९ |
| ५. | क्रीडा | ७ |
| | एकूण | ७१ |

२) ऊर्दु माध्यम

आवश्यक पदे –३२

| अ.क्र. | विषय | आवश्यक पदसंख्या |
|---|---|---|
| १. | उर्दू - भूगोल | ८ |
| २. | इंग्रजी – इतिहास | ८ |
| ३. | गणित | ८ |
| ४. | विज्ञान | ८ |
| | एकूण | ३२ |

अटी / शर्ती -

१) सदर एकत्रित मानधन करार पध्दतीने शिक्षक नेमणूका या पवित्र पोर्टलव्दारे आवश्यक तेवढे शिक्षक प्राप्त न झाल्यामुळे रिक्त राहिलेल्या पदावर करणेत येत आहेत.

२) एकत्रित मानधन करार पध्दतीने शिक्षकांची नेमणूक ही आदेशाच्या दिनांकापासून ०६ महिने कालावधीसाठी राहील. त्यामुळे अर्जदारास कायमपदी नेमणूकीचा हक्क प्राप्त राहणार नाही.

३) करार पध्दतीने एकत्रित मानधन रक्कम रूपये –२७,५००/- ( अक्षरी रक्कम – सत्तावीस हजार पाचशे रूपये फक्त) एवढे राहील. उमेदवारांना शालेय सुट्या वगळुन इतर सुट्या राहणार नाहीत.

४) उमेदवाराने आपल्या अर्जासोबत शैक्षणिक व व्यावसायीक अर्हताविषयक प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्राच्या सत्य प्रती सादर कराव्यात व सर्व मूळ कागदपत्रे छाननीसाठी सोबत ठेवावीत.

५) पात्र उमेदवारांना नेमणूका देताना आवश्यकतेनुसार शिक्षक संख्या कमी – जास्त करण्याचा अधिकार माध्यमिक शिक्षण विभागास राहील.

६) उमेदवाराने सोबत दिलेल्या नमुन्यात सहाय्यक शिक्षक या पदासाठीचा अर्ज मा.अति.आयुक्त (१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या नावाने करावा, सदरचा अर्ज दि.**१२**/०६/२०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत समक्ष पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक विद्यालय संत तुकाराम नगर,पिंपरी पुणे १८ (वल्लभनगर एस.टी. स्थानकाजवळ) येथे जमा करावेत. व अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रति पडताळणीसाठी सोबत आणाव्यात. सायंकाळी ०५.०० नंतर आलेल्या उमेदवारांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

७) पोस्टाने/ कुरीयर ने येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही,याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८) निवड झालेल्या उमेदवारास एकत्रित मानधना व्यतिरीक्त कोणत्याही सोयी सुविधा हक्क व इतर आर्थीक लाभ देय राहणार नाही. (उदा.दिवाळी बोनस तथा सानुग्रह अनुदान)

९) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित नमुण्यातील अर्ज / शैक्षणिक पात्रता धारण न करणारे,तसेच नेमणूकीसंदर्भात दबाव तंत्राचा वापर केल्यास उमेदवारी अथवा निवड रद्द बद्दल व नियुक्ती झाल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करणेत येईल.

१०) मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

११) अर्जदाराने आपले अर्ज महापालिकेच्या जाहीरातीमध्ये विहित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील.

१२) अपुर्ण माहिती व अटिची पुर्तता न करणा-या उमेदवाराचे अर्ज बाद करून अपात्र ठरविले जातील, याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१३) सदरची पदाची निवड ( सहा.शिक्षक ) ही पुर्णपणे तात्पुरत्या व हंगामी स्वरूपाची आहे.उमेदवारास कायमस्वरूपी नियुक्तीचा अधिकार राहणार नाही.सदरचे पद हे शैक्षणिक वर्ष – २०२४-२०२५ करीता आवश्यकतेनुसार राहील.

१४) नियुक्ती दिल्यानंतर उमेदवारांना मनपाच्या कोणत्याही विद्यालयात कामकाज करावे लागेल.तसेच विद्यालयाच्या आवश्यकतेनुसार गरज पडल्यास इतर विषयाच्या अध्यापनाचे कामकाज करावे लागेल.

१५) उमेदवाराची नियुक्ती करार पध्दतीने असल्यामुळे यासंबंधी करार करून देणे बंधनकारक राहील.

१६)पवित्र पोर्टलव्दारे कायमस्वरूपी शिक्षक महानगरपालिकेस उपलब्ध झाल्यास आपली नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

सदरची जाहीरात व अर्जाचा नमुना महापालिकेच्या www.pcmcindia.gov.inया संकेत स्थळावर पाहता येईल.जाहिरातीनुसार कार्यवाही करणे अथवा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अंतिम निर्णय मा.अतिरिक्त,आयुक्त(१) यांचा राहील.

( प्रदीप जांभळे पाटील )
अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
पिंपरी पुणे – १८

जाहीरात क्रमांक
क्र.माध्य/शि/०१/कावि/३८९ /२०२४ दि.०४/०६/२०२४

<u>उमेदवाराने करावयाचा मराठी व ऊर्दु माध्यम अर्जाचा नमुना</u>

माध्यम - मराठी / ऊर्दु

प्रति,
मा.अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे – १८

फोटो

विषय – सन २०२४ – २५ या शैक्षणिक वर्षाकरीता एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने शिक्षकांच्या नेमणूकीबाबत
संदर्भ – जाहीरात क्र. ०१ दि.१७/०६/२०२४ प्रसिध्द झालेली जाहिरात

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी एकत्रित मानधनावर करार पद्धतीने माध्यमिक शिक्षण विभागात तात्पुरत्या स्वरुपात सहा.शिक्षक या पदाकरीता आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरिता विहित नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

आडनाव स्वत:चे नाव वडिलांचे/पतीचे नाव

१) संपूर्ण नाव - ____________ ____________ ____________

२) पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोडसह – ____________________

____________________

३)मोबाइल नंबर- | | | | | | | | | |

४) जन्मतारीख - / /

५) लिंग - स्त्री / पुरुष

६) जात - प्रवर्ग –

७) बी.एड./ बी.पी.एड मुख्य विषय - | १ - | २ - |

८) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल –

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | पदवीचा विषय | | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | शे.गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. | - | | | | | |
| २ | एच.एस.सी. | - | | | | | |
| ३ | बी.ए./ बी.एस्सी | | | | | | |
| ४ | बी.एड. / बी.पी.एड. | | | | | | |

वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करते/करतो की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे एकत्रित मानधन नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहीन तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

आपला/आपली विश्वासु

स्थळ – स्वाक्षरी

दिनांक - /०६/२०२४ अर्जदाराचे नाव ( )

- पर्सेंटाईल गुण असणा-या उमेदवारांनी संबंधीत विद्यापिठाची शेकडा गुणांची प्रमाणित प्रत जोडावी,सदर प्रत नसेल तर अर्ज बाद केला जाईल.
- १)एस.एस.सी.गुणपत्र/प्रमाणपत्र, २) एच.एस.सी.गुणपत्र/प्रमाणपत्र, ३)पदवी गुणपत्र/प्रमाणपत्र ४) बी.एड/बी.पी.एड गुणपत्र/प्रमाणपत्र ५) जात दाखला ६) जात पडताळणी (असल्यास) या क्रमाने कागदपत्रांच्या सत्यप्रतीजोडाव्यात. याव्यतिरिक्त अनावश्यक कागदपत्रे जोडू नयेत.